# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
# (सचिवालय)

**प्रस्तावना :-** **विकास योजना —नागपूर**

**{नगर रचना विभाग}** मौजा —फुटाळा नगर भुमापन क्र. ४ येथील जागा गणपती विसर्जन करण्यास्तव.टँक बनविण्याकरिता वनविभागाची जागा महानगरपालिकेस मिळणेबाबत.

नागपूर शहरातील मंजुर विकास आराखडयामधील मौजा- फुटाळा नगर भुमापन क्र. ४ येथील एकुण क्षेत्र ०.११० हेक्टर जागा फुटाळा तलावा लगत असुन नागपूर महानगरपालिकेच्या सार्वजनिक बांधकाम विभागातर्फे उक्त जागेवर गणपती विसर्जन करण्याकरिता टॅक बनविण्याकरिता आवश्यक असल्याने उक्त जागा महानगरपालिकेस आवश्यक आहे. सदर जागा झुडपी जंगलकरिता आखीवपत्रिकेवर नमुद असुन उक्त जागा वनविभागाची आहे.

सदर जागेवर महानगरपालिकेला विकास करावयाचा असल्याने सदरहु जागा महानगरपालिकेला हस्तांतरित करणे आवश्यक आहे. सदर वनविभागाकडे जागा महानगापालिकेस हस्तांतरित करण्यास्तव प्रशासकीय ठराव पारीत करुन जागा मागणीचा प्रस्ताव वनविभागास सादर करणे आवश्यक आहे. सदर जागा मागणीचा प्रस्ताव प्रशासकीय ठराव पारीत करण्यास्तव, विषय विचारात घेणेस्तव प्रस्ताव सादर.

# पारीत ठराव

**ठराव क्रमांक :- 44/मनपा/प्रशासक** **दिनांक :-** 08/02/2024

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार उपसंचालक, नगर रचना विभाग यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार **विकास योजना —नागपूर** मौजा —फुटाळा नगर भुमापन क्र. ४ येथील जागा गणपती विसर्जन करण्यास्तव.टँक बनविण्याकरिता वनविभागाची जागा महानगरपालिकेस मिळणेबाबत.

नागपूर शहरातील मंजुर विकास आराखडयामधील मौजा- फुटाळा नगर भुमापन क्र. ४ येथील एकुण क्षेत्र०.११० हेक्टर जागा फुटाळा तलावा लगत असुन नागपूर महानगरपालिकेच्या सार्वजनिक बांधकाम विभागातर्फे उक्त जागेवर गणपती विसर्जन करण्याकरिता टॅक बनविण्याकरिता आवश्यक असल्याने उक्त जागा महानगरपालिकेस आवश्यक आहे. सदर जागा झुडपी जंगलकरिता आखीवपत्रिकेवर नमुद असुन उक्त जागा वनविभागाची आहे.

सदर जागेवर महानगरपालिकेला विकास करावयाचा असल्याने सदरहु जागा महानगरपालिकेला हस्तांतरित करणे आवश्यक आहे. सदर वनविभागाकडे जागा महानगापालिकेस हस्तांतरित करण्यास्तव प्रशासकीय ठराव पारीत करुन जागा मागणीचा प्रस्ताव वनविभागास सादर करणे आवश्यक आहे. सदर जागा मागणीचा प्रस्ताव प्रशासकीय ठराव पारीत करण्याच्या प्रस्तावास मा. प्रशासक यांनी मंजुरी प्रदान केली.